
ISSN : 2393-8900

# Historicity

International Research Journal

Volume - Volume - 6 | Issue - 12 | Aug - 2020
Impact Factor : 2.7825(UIF)



Editor-In-Chief
Dr. Sanjay Gaikwad

**Chief Patron**
**Dr.Vasant Shinde**
Director/Vice-Chancellor
Deccan College,Deemed University,Pune, Maharashtra

**Editor-In-Chief**

**Dr.Sanjay Gaikwad**

M.H.Mahadik Arts and Commerce College, Modnimb. Solapur, Maharashtra

**Editor**

**Dr.Ravikiran Jadhav**

D.B.F Dayanand College Of Arts & Science
Solapur, Maharashtra

## Review Board:

**Dr.Mahalingam**
Madurai, Tamilnadu.

**Dr.Smita Surebankar**
Belgaon, Karnataka.

**Dr. Anura Mantunga**
Sri Lanka.

**Dr.S.K Kallolikar**
Dharwad, Karnataka.

**Dr.Nimal Parera**
Shrilanka.

**Dr. Sanjay Gaikwad**
Solapur, Maharashtra.

**Dr. Jenee Peter**
Ernakulam, Kerala.

**Dr. Ravikiran Jadhav**
Solapur, Maharashtra.

**Dr. Shanti Pappu**
Chennai, Tamil Nadu.

## Advisory Board:

**Dr. Deepak Gaikwad**
Pune, Maharashtra

**Dr. Satish Kapoor**
Jalandhar, Panjab

**Dr. Kishor Gaikwad**
Mumbai, Maharashtra.

**Dr. Lalit Pandey**
Udaipur, Rajasthan

**Dr. M. A Khan**
Raipur, Chhatisgarh

**Dr. Vankatesha V.**
Belgaum, Karnataka.

**Dr.S.K Kallolikar**
Dharwad, Karnataka.

**Dr.Pradip Meshram**
Nagpur, Maharashtra.

**Dr. V. H Sonawane**
Vadodara, Gujarat.

**Prin. Somnath Rode**
Latur, Maharshtra

**Dr. Binda Paranjape**
Banaras, Uttar Pradesh

**Dr. Aradhana Kumari**
Amroha, Uttar Pradesh.

**Dr. Rambabu Meher**
Hoshangabad, Madhya Pradesh.

**Dr. Dadu Mandrekar**
Goa

**Dr.Smita Surebankar**
Belgaum, Karnataka.

**Dr. Jenee Peter**
Ernakulam, Kerala.

**Dr. Anura Mantunga**
Sri Lanka.

**Dr. Pundhir M.K**
Aligarh, Uttar Pradesh.

**Dr. Manjula B. Chincholi**
Gulbarga, Karnataka.

**Dr. Shanti Pappu**
Chennai, Tamil Nadu

**Dr. S.V Jani**
Rajkot, Gujarat

**Dr.Mahalingam**
madurai, Tamilnadu.

**Dr.Nimal Parera**
Shrilanka.

Histori city

# HISTORICITY RESEARCH JOURNAL

ISSN NO:- 2393-8900
Vol- 6 | Issue 12 | Aug -2020

## Contents

समकालीन दलित कथा – स्थिती आणि गती


1 FACTORS AFFECTING THE EMERGENCEAND DEVELOPMENTOF IRON AND STEEL INDUSTRY IN COLONIAL INDIA: A HISTORICAL OVERVIEW
Chiranjit Gorai

7 आदिवासी समाज व संस्कृति की अवधारणा
डॉ. गफार सिकंदर मोमीन

10 HISTORY OF POSTAL COMMUNICATIONS DURING MEDIEVAL DECCAN
Dr. Ladaf S. K.

17 श्रीमद्भगवद्गीता में योग स्वरूप विमर्श
देव प्रकाश गुजेला

26 BASICS OF ENGLISH COMMUNICATION
Prof. Arun Govindrao Mitragotri

30 समकालीन दलित कथा स्थिती – आणि गती
डॉचंद्रकांत शंकर कांबळे.

35 AMBEDKAR AND BUDDHISM: RELIGIOUS IDENTITY AND PRACTICES AMONG NEO-BUDDHIST IN CONTEMPORARY INDIA
Mukesh Kumar

45 मंगळवेढा तालुक्याच्या आर्थिक विकासातील साखर उदयोगाचे योगदान विशेष संदर्भ श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना
डॉ. मरे राजकुमार श्रीहरी

ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | AUG - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# समकालीन दलित कथा – स्थिती आणि गती



**डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे**
**विभागप्रमुख, मराठी विभाग ,**
**किसन वीर महाविद्यालय,वाई.**

**प्रास्ताविक:**

इ.स १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वकियांच्या हाती सत्ता आली. त्यामुळे सामाजिक प्रश्न आ आपोआप सुटले जातील हा बहुजनांचा आशावाद निरस ठरला. सामाजिक प्रश्न सुटण्याऐवजी ते अधिकच गुंतागुंतीचे नि झालेत. बहुजनांच्या कल्याणासाठी तयार केलेले कायदे घटनेतच राहिले. थोडक्यात, सामाजिक प्रश्न सुटण्याऐवजी ते अ जटील झालेत. त्यामुळे बहुजन समाजात जागृती करणे आवश्यक वाटू लागले आणि या जाणिववेतूनच १९६० च्या आस समाजप्रबोधनाचे दुसरे पर्व सुरु झाले. विषेशतः तो काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वविचारांच्या मंथनाचा होता अ यातूनच या काळात दलित साहित्याचा प्रवाह उदयास आला. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये समकालीन दलित कथेच्या स्थिती गत आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. विषय तसा खूप व्यापक आहे, तरीदेखील काही महत्वाचे दलित कथाकार व त आंबेडकरी विचार केंद्रस्थानी ठेऊन लिहिलेल्या कथा यांचा विचार प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

**दलित कथा पार्श्वभूमी :**

मराठी भाषेतील साहित्यप्रवाहात ग्रामीण कथेचा प्रवाह सुरु झाला, त्याच सुमारास दलित कथा लिहिली ज लागली. तेव्हापासून आजतागायत दलित कथेच्या विकासाचे साधारणपणे १९३० ते १९५६, १९५६ ते १९८०, आणि १९ नंतरचा असे तीन कालखंड मानले जातात. पहिला टप्पा हा आंबेडकरकालीन असून त्यात प्रामुख्याने बंधुमाधव हे प्र कथालेखक आहेत. दुसऱ्या कालखंडात बाबुराव बागूल आणि तिसऱ्या कालखंडात प्रा.केशव मेश्राम आणि वामन हो इत्यादींचा समावेश करता येईल. पहिल्या टप्प्याच्या अखेरीस आणि दुसऱ्या टप्प्याच्या प्रारंभीच्या काळात आण्णा भाऊ स आणि शंकरराव खरात कथालेखन करत होते. असे असले, तरी आण्णा भाऊंचा आजच्या दलित चळवळीशी साक्षात सं नव्हता. मात्र शंकरराव खरात हे आंबेडकरकालीन दलित चळवळीशी संबंधीत होते. तरीदेखील अण्णा भाऊंना बदल संदर्भात घडत असलेल्या दलित चळवळीचे भान आणि जाणीव होती. १९६९ मध्ये अण्णा भाऊंचे निधन झाले, त्यावेळी बाबु बागूल दलित लेखकांचे प्रेरणास्थान होते.

अण्णा भाऊंच्या कथेत दलित जीवनातील संघर्ष आहे पण वर्णव्यवस्थेविरुध्दचा आक्रोश आणि समाजव्यवस्थेविरुध्द विद्रोह या दलित साहित्याच्या अंगभूत प्रवृत्ती जितक्या प्रकर्षाने बाबुराव बागूल यांच्या कथात जाणवतात तितक्या प्रकर्षाने जाणवत नाहीत. 'जग बदल घालूनी घाव। सांगूनी गेले भिमराव' या विचारामधून अण्णा भाऊंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षशील वृत्तीचे संदेशन दिले, हेही खरंच आहे. परंतु, बाबूराव बागूलांच्या पिढीला दलित साहित्य हे विद्रोही साहित्य म्हणून अभिप्रेत होते, तो विद्रोह अण्णा भाऊंच्या कथेत प्रकर्शाने जाणवत नाही.

मराठी कथा 'करमणूक', 'मनोरंजन', 'प्रतिभा', 'किर्लोस्कर', 'सत्यकथा', 'अभिरुची' इत्यादी प्रस्थापित मध्यमवर्गीय नियतकालिकातून लिहली जात होती, त्याचप्रमाणे दलित कथेच्या विकासात 'जनता', 'प्रबुध्द भारत', 'पंचशील', 'नागपूर पत्रिका' इत्यादी दलितवर्गीय नियतकालिकांचा वाटा आहे. बंधुमाधव यांची 'जावे त्याच्या वंशा' ही पहिली कथा 'जनता' साप्ताहिकातून १९५३ मध्ये प्रकाशित झाली. दलितांच्या वाटयाला येणारे हीन- दीन जीवन, त्यांच्या व्यथा - वेदना, त्यांच्या मनातील विचार – विद्रोह यांना बंधुमाधव यांनीच प्रथम वाचा फोडली, असे म्हणता येईल.

**समकालीन दलित कथेचे स्वरुप:**

लेखकाची जडणघडण होत असताना तो ज्या काळात लहानाचा मोठा होतो, ज्या समाजात वावरतो त्या काळाचा, समाजाचा, आणि पर्यावरणाचा परिणाम त्याच्या व्यक्तीमत्वावर होणे स्वाभाविक आहे. पण या परिस्थतीचे वर्णन साहित्याच्या माध्यमातून मूर्त स्वरूपात आणने हे प्रत्येक लेखकाला शक्य होईलच असे नाही. त्यासाठी आत्मभान, परिस्थितीची जाण, यातनांची जाणीव, सर्जनशीलतेची ओढ, प्रवाहाच्या विरूध्द दिशेने जाण्याची शक्ती आणि सूक्ष्म निरीक्षण या गुणांची आवश्यकता असते. ती सर्वच लेखकांकडे असते असे नाही. मग त्यास दलित कथालेखकही अपवाद नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरीत झालेला युवक कुठेतरी आत्मसन्मान शोधण्याचा प्रयत्न करीत होता. अन्न, वस्त्र, निवारा यांबरोबरच शिक्षण आणि सन्मानाची वागणूक या गरजा देखील तितक्याच महत्वाच्या आहेत, हा विचार दलित युवक आपल्या समाजाला सांगत होता. आजपर्यंत जे भोगलं, जे सोसलं ते आता बस् झालं, आता हे शक्य होणार नाही, अशाप्रकारची आत्मजागृती करण्याचे प्रयत्न केले जात होते.

बाबुराव बागूलांच्या 'विद्रोह' या कथेतील नायक 'जय' आपल्या वडिलांना ओरडून सांगताना म्हणतो, "........पिताजी वाटेल ते झालं तरी मी शिक्षण सोडणार नाही माझ्यावर लादलेली भंग्याची नोकरी करणार नाही. उलट शिक्षण पूर्ण झाल्यावर मी या अमानुष प्रथेचा, अस्पृश्यतेचा कर्दनकाळ होऊन नाश करणार आहे......."[१] थोडक्यात आत्मभान जागृत झालेला दलित युवक प्रस्थापित व्यवस्थेला नाकारू पाहतो. तर 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथेतील नायक नोकरी टिकवण्यासाठी स्वतःची जात लपवताना पहायला मिळतो, हे समकालीन परिस्थितीचे चित्रण बाबुराव बागूल अचूकपणे मांडतात. शिवाय याच काळात आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीवर मात करुन शिक्षण घेऊन नोकरी लागलेल्या प्रकाशच्या बेगडी जीवनाचे चित्रण योगीराज वाघमारे 'बेगड' या कथेमधून करताना दिसतात.

दलित जीवन आणि दलित चळवळ यांचे जवळून दर्शन घडविणारे अर्जुन डांगळे यांनी ग्रामीण आणि शहरी जीवनाची विविधांगी चित्रे आपल्या कथांतून रेखाटली आहेत. दलितांवर होणारे अन्याय-अत्याचार याचे चित्रण 'बांधावरची माणसं'(१९८१) या कथासंग्रहात येताना दिसते, त्यांच्या कथेची प्रवृत्ती ही सामाजिक समतेची अपेक्षा करताना दिसते. "आपण जेव्हा इतरांकडून सामाजिक न्यायाची अपेक्षा करतो, त्यावेळी आपण तो इतरांना देतो की नाही, हेदेखील पाहिले पाहिजे."[२] तर योगेंद्र मेश्राम यांच्या कथेवर नजर टाकल्यास नागर जीवनापेक्षा दलित ग्रामीणांचे जीवन जास्त दुःखमय, संकटमय असल्याने दलितांवर

होणारा अन्याय, अत्याचार, स्त्रियांवरील जुलूम, ग्रामीण गुंडगिरी, अंधश्रध्दा त्यांच्या कथांमधून दिसून येते. योगेंद्र मेश्राम यां
कथेबाबत प्रकाश खरात म्हणतात, "त्यांच्या कथेत सामाजिक आर्थिक दुःख आहे, हे दुःख संवेदनाक्षम लेखकमनाला प्रक
आणवणारे आहे. त्यामुळे ते दलित कथेत आग्रही होऊन प्रकट झाले आहे. इतर दलित लेखकांप्रमाणे मेश्रामांनीसुध्दा अंधश्र
देव व शोषण, परंपरा यामधील फोलपणा उघडकीस आणून दिला आहे."[३] प्रकाश खरात यांच्या वरील मताचा प्रत्यय आप
केशव मेश्राम यांच्या 'सावधान' या कथेमधून, तर सवर्णियांच्या मनात जातीयता किती खोलवर रूजलेली आहे, याचा प्र
'आक्रोश' आणि 'उद्ध्वस्त' या कथांमधून येतो.

वामन होवाळ यांचे नाव समकालीन दलित कथेच्या संदर्भात आवर्जून घ्यावे लागेल, कारण वामन होवाळ हे त्या समकालीन कथालेखकांपेक्षा वेगळया क्षमतेचे कथाकार आहेत. त्यांच्या कथेचे वेगळेपण सांगताना शंकरराव खरात लिहि "गावकुसाबाहेर राहणाऱ्या दलितांच्या जीवनाकडे खऱ्या अर्थाने मध्यमवर्गीय लेखकांचे लक्षच गेलेले नाही, अस्पृश माणसा दुखाचा हुंदका त्यानी जगाला सांगितला नाही. दलितांना दलित म्हणून ठेवणाऱ्या प्रस्थापित रूढी परंपरा, शास्त्र यावि आपला आवाज मध्यमवर्गीय साहित्यिकांनी उठवला नाही."[४] खरात यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थिती तसेच मध्यमव लेखकांनी दलितांच्या जगण्याकडे कशा प्रकारे डोळेझाक केली होती, हे स्पष्ट केले आहे. शहरात वास्तव्य असूनही ग्रा परिसरातील बदलत्या परिस्थितीला ते सामोरे जातात, बदलत्या वास्तवात दलित जीवनही एकसंघ राहिलेले नाही. श जीवनाशी एकात्म होऊ पाहणारा, ग्रामीण परिसरात अजूनही मागसलेपणा अनुभवणारा, तसेच मध्यमवर्गीय जीवन झुकणारा, असे विविध स्तर दलित जीवनात निर्माण झालेले आहेत. सवर्ण आणि दलित समाजांतर्गत विविधस्तरीय निर्माण होत आहेत. या सर्व ताणांकडे वामन होवाळ डोळसपणे आणि जागृतपणे पाहतात. बदलते वास्तव गंभीर आहे, वामन होवाळ विनोदाच्या अंगाने कथा फुलवतात, याचा अर्थ त्यांची कथा विनोदी कथा आहे, असे नाही. दलित जीव अनुभवलेले गांभीर्य, विनोदाचा परिवेश धारण करुन त्यांच्या कथेत व्यक्त होते. अवतीभवतीच्या समाजजीवना वास्तवानुभवाचे कथन करायचे आहे, हे भान समोर ठेऊन होवाळ समकालीन परिस्थितीवर भाष्य करतात.

दलित बालपण, दलित तारूण्य, दलित स्त्रीत्व, दलित अज्ञान, दलित दुर्दैव, इत्यादींना समकालीन दलित क आकार येऊ लागला आहे. गतकालीन दलित जीवनाइतकाच वर्तमानकालीन अथवा समकालीन जीवनाचा वेध घेण्याचा प्र हे कथालेखक आपल्या कथांमधून करताना दिसतात.

समाजाभिमुख असलेल्या दलित कथेत दलितांची संसारचित्रे रेखाटली जातात. कुटुंबातील व्यक्ती, त्यांचे परस्पर त्यातून निर्माण होणारे ताण-तणाव, आंतरजातीय विवाहातून निर्माण होणाऱ्या समस्या, आधुनिकतेचा स्वीकार क परंपरांना जाणारा छेद, बदलत्या परिस्थितीत मध्यमवर्गीय, उच्चवर्णीय मनोवृत्तीचे कळत - नकळत होत जाणारे अभि आणि त्याचवेळी आपली ओळख टिकवण्यासाठीची धडपड वास्तवस्वरूपात घडविण्याचा प्रयत्न समकालीन दलित कथा क

## दलित कथेतील समकालिनत्व काल आणि आज

१९६० ते १९८० पर्यंतच्या दलित कथेचा आढावा घेतल्यास या कालखंडातील बहुतांशी दलित कथा समकालीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित झालेला, सामाजिक अन्यायाबरोबर अठराविश्वे दारिद्र्याने पछाड समाजातील हा लेखकवर्ग समकालीन दलित जीवनाचे चित्रण करताना कुठेही हात आखडता घेत नाही. ज्या व्यथा आपला समाज भोगत आहे, सामाजिक, आर्थिक, राजकीय अन्यायाला बळी पडत आहे, त्याचे वास्तव चित्रण या काळा दलित कथेत झालेले दिसते. पण नव्वदोत्तर दलित कथेवर नजर टाकली असता, त्यामध्ये समकालीनत्वाचा

जाणवल्याशिवाय राहत नाही. बदलत्या समाजजीवनाचे प्रभावीपणे चित्रण करताना लेखनीची धार बोथट झाल्याचे दिसते. या कालखंडातदेखील वामन होवाळ दलित कथालेखनात आघाडीवर होते. 'मजल्याचं घर' ही त्याची कथा बदलत्या दलित जीवनावर भाष्य करताना दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या प्रेरणेने शिक्षण घेतलेला, आत्मभान व आत्मबल प्राप्त झालेला विचारप्रवर्तक नवयुवक वेगवेगळया माध्यमातून हिरावून घेतलेले विविध प्रकारचे हक्क, विनंतीच्या, भिकेच्या स्वरूपात नाही, तर स्वाभिमानाने आणि घटनेच्या अधिकाराने मिळवण्याचा प्रयत्न करताना पहावयास मिळतो.

डॉ. संजीवकुमार सोनवणे यांचा 'गाव कुठे आहे' हा कथासंग्रह आजच्या समकालीन परिस्थितीत लक्षवेधी ठरतो. पारंपरिक मानसिकतेच्या उच्चवर्णीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण एक डोकेदुखी वाटते, याचे चित्रण 'पंचायत' या कथेमधून त्यांनी नेमकेपणाने केले आहे. शिवाय ढोंगी दलित नेतृत्वावरदेखील पांघरूण घालण्याचा प्रयत्न डॉ. सोनवणे करत नाहीत, याचा प्रत्यय 'बॅकलॉग' या कथेच्या माध्यमातून येतो.

थोडक्यात, अलिकडच्या काळातील काही कथांचा अपवाद वगळता, बदलत्या दलित समाजाचे चित्रण आजच्या दलित कथेत प्रभावीपणे होताना दिसत नाही.

## समकालीन दलित कथेकडून अपेक्षा

आजपर्यंतच्या दलित कथेचा बारकाईने विचार केला असता, १९९० च्या अगोदरची दलित कथा ही नक्कीच समाजकेंद्री होती. पण त्यानंतर तिची धार बोथट झालेली दिसते. दलित चळवळीच्या तसेच दलित साहित्याच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेला अन्याय, अत्याचार यापासून समाजाची काही अंशी सुटका झाली. दलित समाजात नवचैतन्य निर्माण झाले. समाजाच्या सुरक्षिततेसाठी अॅट्रॉसिटीसारखा मजबूत कायदा आला. सर्व क्षेत्रांमध्ये उच्चपदांपर्यंत दलित तरूणाने मजल मारली. राजकीय आरक्षणातून नवीन नेतृत्व समाजाला मिळाले. असे असले, तरी आज दलित समाजाचे सामाजिकरण झाले आहे का? याचे उत्तर शोधणे आवश्यक आहे.

अॅट्रॉसिटीसारख्या विषयावर बोलायचे झाले, तर खरच या कायद्यामुळे दलित समाज कितपत सुरक्षित झाला आहे ? कारण पारंपरिक राजकीय घराणी एक राजकीय डावपेच म्हणून एखादया दलित व्यक्तीला हाताशी धरून जातीयवादी तक्रारी दाखल करतात, हे ग्रामीण भागातील वास्तव काही उदाहरणांवरून दिसते. त्यामुळे महत्वाच्या कायदयाची विश्वासार्हता धोक्यात येताना दिसते. शिवाय ग्रामीण भागातील दलित समाजातून पुढे आलेले एखादे नेतृत्व सरकारमार्फत आलेल्या योजना आपल्याच बांधवापर्यंत पोहचू नये, यासाठीदेखील प्रयत्न करताना दिसते. मग इंदिरा आवास योजनेतील घरकुल असेल, अथवा समाजकल्याणच्या अंतर्गत येणाऱ्या योजना असतील. स्थानिक स्वराज्य संस्थेत राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून दलित बांधवाना सरपंच, सभापती, जिल्हाध्यक्ष या पदावर संधी मिळाल्यानंतर, याचा उपयोग समाजासाठी कितपत झाला? की, पारंपरिक वर्चस्वाने त्यांचे आधिकार फक्त सहीपुरतेच मर्यादीत ठेवले ? या सर्व बदलत्या दलित समाजाच्या समस्यांचा मागोवा समकालीन दलित कथा घेताना दिसत नाही.

## समारोप

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दलित कथेची थोडक्यात पार्श्वभूमी मांडून सुरूवातीची दलित कथा आणि आजची कथा यामधील समकालीनतेचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.यामध्ये सुरूवातीची दलित कथा ही वास्तव आणि

समाजाभिमुख दिसते, तर आजची दलित कथा सद्यपरिस्थिती आणि दलित समाजाचे बदलते स्वरूप याबाबतीत कमी पड दिसते आहे. कारण १९९० च्या पूर्वीची बरीचशी दलित कथा आजही समकालीन ठरते आणि आजची बरीचशी दलित क समकालीन प्रश्नांना बगल देऊन भूतकाळात रमताना दिसते.

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोधनिबंधावरून काही निरीक्षणे नोंदविता येतील, ती पुढीलप्रमाणे...

१) प्रारंभीची दलित कथा भूतकाळात समकालीन आहेच, शिवाय ती वर्तमान समाजजीवनावर भाष्य करत, भविष्यका परिस्थितीचा वेध घेतानादेखील दिसते.

२) समकालीन दलित कथेच्या केंद्रस्थानी शक्यतो ग्रामीण दलित समाज असल्याचे जाणवते.

३) आजची दलित कथा काही अपवाद वगळता सद्यपरिस्थिती, बदलता दलित समाज आणि बदलत्या समस्या याबाबत प दिसत नाही.

४) अलिकडच्या दलित कथेत भूतकाळाची पुनरावृत्ती होताना दिसते.

**संदर्भ**


१) बागूल बाबुराव, 'जेव्हा मी जात चोरली होती' अभिनव प्रकाशन, मुंबई, दु.आ.१९७६,पृ. १३१.

२) 'अमृत' जानेवारी १९७६. पृ.९

३) खरात प्रकाश, दलित कथा उगम आणि विकास, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९२, पृ. ५४

४) खरात शंकरराव, अ.भा.मराठी साहित्य संमेलन, ५८ वे अधिवेशन,१९८४ जळगाव, अध्यक्षीय भाषण